

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक २९५ * नांदेड * गुरूवार, दि. ५ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा शरद पवारांना फोन

मोदी म्हणाले : देशाकडे लक्ष देण्यासाठी सुप्रिया सुळे आणि आम्ही आहोत, तुम्ही प्रकृती सांभाळा

मुंबई (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोनवरून शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. 'शरदराव, तुम्ही स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या, देशाकडे लक्ष देण्यासाठी सुप्रिया सुळे आहेत, त्यांच्यासोबत आम्ही काम करू. तुम्ही विश्रांती घ्या आणि आम्हाला मार्गदर्शन करत राहा, मार्ग दाखवत राहा. तुम्ही काळजी घेणे आणि या गोष्टींपासून थोडे दूर राहणे गरजेचे आहे. तुमचे आरोग्य उत्तम राहावे हीच आमची इच्छा आहे, तुमचा सल्ला आम्हाला मिळत राहो आणि तुम्ही तंदुरुस्त राहा, असे नरेंद्र मोदी हे फोनवर बोलले असल्याची माहिती शरद पवार यांच्या निकटवर्तीयांनी पत्रकारांना दिली.



यासंदर्भात महिती देताना शरद पवारांचे निकटवर्तीय विठ्ठल मणियार यांनी सांगितले की, आज महत्वाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोन आला होता. त्यांनी पवार साहेबांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्याचबरोबर अत्यंत प्रेमाने मोदींनी सांगितलं, शरदराव, तुम्ही स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्या, देशाकडे लक्ष देण्यासाठी सुप्रिया सुळे आहेत, त्यांच्यासोबत आम्ही काम करू. तुम्ही विश्रांती घ्या आणि आम्हाला मार्गदर्शन करत राहा, मार्ग दाखवत राहा. तुम्ही काळजी घेणे आणि या गोष्टींपासून थोडे दूर राहणे गरजेचे आहे. तुमचे आरोग्य उत्तम राहावे हीच आमची इच्छा आहे, तुमचा सल्ला आम्हाला मिळत राहो आणि तुम्ही तंदुरुस्त राहा, अशा प्रकारे त्यांनी इच्छा व्यक्त केली आणि सदिच्छा देखील दिल्या असल्याचं विठ्ठल विठ्ठल मणियार यांनी बोलताना सांगितलं आहे.

डॉक्टरांनी शरद पवारांना सांगितलं आहे की, दौरे कमी केले पाहिजेत. प्रवास कमी केला पाहिजे, त्याच्यात थोड्या मर्यादा आणल्या पाहिजेत. प्रवासही कमी केले पाहिजे, दुसरं त्यांनी डाएट व्यवस्थित घेतला पाहिजे, त्यामुळे आता हळूहळू त्यांचा अशक्तपणा कमी होईल, त्यांनी दोन चार दिवस आराम केला पाहिजे, असंही विठ्ठल मणियार यांनी म्हटलं आहे.

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांत मोठ्या अंतर्गत उलथापाथी असल्याचे बोलले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अनेक वरिष्ठ नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नवी दिल्लीत भेट घेतली आहे. याच पार्श्वभुमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांच्याशी दुरध्वनीवर केलेले संभाषण महत्वाचे मानले जात आहे.

शरद पवार पुन्हा रूग्णालयात दाखल

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात तपासण्यांसाठी दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांना सकाळीच पुण्यातील रुबी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. आता मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात पुढील तपासण्यांसाठी शरद पवार यांना दाखल करण्यात आलं आहे. यावेळी त्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फोन करून प्रकृतीची विचारपूस केली.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये खदखद; बैठकीला १७ आमदारांची दांडी

मुंबई (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या गटाने दिल्लीत जाऊन परस्पर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्यानंतर महाराष्ट्रात सध्या वेगवान राजकीय घडामोडी सुरु असल्याचे दिसत आहेत. अशातच राष्ट्रवादीच्या बोलाविण्यात आलेल्या बैठकीत १७ आमदारांनी दांडी मारल्याने चर्चेला उधाण आले आहे.

मुंबईतील देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची बैठक पार पडली. राष्ट्रवादीच्या आमदारांच्या बैठकीला १७ आमदारांनी दांडी मारली. ५० पैकी ३३ आमदारांनीच बैठकीला हजेरी लावली होती. राष्ट्रवादीचे विधानसभेत ४१ आमदार आहेत. पण कालच्या बैठकीला २९ आमदारच हजर होते. विधानसभेचे १२ आमदार बैठकीला गैरहजर होते. या आमदारांनी आपला पक्ष सत्तेत असूनही कामं होत नसल्याची तक्रार बोलून दाखवली. एकनाथ शिंदे यांच्याकडून कामे होतं नसल्याची काही आमदारांची तक्रार होती.

नांदेड पोलिसांचे मध्यरात्री 'कॉम्बिंग ऑपरेशन'; १२२ सराईत गुन्हेगारांची झाडाझडती, ७ गुन्हे दाखल



नांदेड (प्रतिनिधी)- जिल्ह्यात मालमत्तेविरुद्ध तसेच शारीरिक स्वरूपाचे गुन्हे रोखणे, सराईत गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवणे आणि कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११ ते दि. ४ नोव्हेंबर रोजी पहाटे ३ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले.

या विशेष मोहिमेदरम्यान सराईत गुन्हेगार, अवैध शस्त्र बाळगणारे, हद्दपार/तडीपार, हिस्ट्रीशीटर तसेच पाहिजे व फरारी आरोपी यांची सखोल पडताळणी करण्यात आली. या मोहिमेसाठी ५३ पोलीस अधिकारी व २०३ अंमलदार नियुक्त करण्यात आले आहेत. या मोहिमेत तडीपार/प्रस्तावित २७ गुन्हेगार २७, एमपीडीएमधून सुटलेले ३१ गुन्हेगार, कलम १२२, महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हे दाखल असलेल्या ७ गुन्हेदार तर ३१+५ जणांना वॉरंट बजावणी व ४४ जणांना समन्स बजाविण्यात आले आहेत.

या मोहिमेमुळे जिल्ह्यातील सराईत व प्रतिबंधित गुन्हेगारांच्या हालचालींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यास मदत झाली असून, ४४ समन्स व ३१ जामीनपात्र वॉरंट बजावण्यात आले, तर ५ नॉन बेलेबल वॉरंटमधील आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

सदर विशेष मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, आरसीपी पथक यांनी सक्रिय सहभाग घेतला.

सराईत गुन्हेगार, तडीपार, पाहिजे व फरारी आरोपी तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध अशाच मोहिमा पुढेही राबवण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक कार्यालयाने कळवले आहे.

जरांगेंकडे पोहोचली चौकशी समिती; ५०० कोटी रूपयांबाबतच्या क्लिपची मागणी

क्लिप देणाऱ्याच्या जीवाला धोका होणार नाही याची शाश्वती द्या -मनोज जरांगे पाटील

मुंबई (प्रतिनिधी)- मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटींच्या आरोपांची ऑडिओ क्लिप पत्रकार परिषदेतून समोर आणल्यानंतर आता या घटनेची चौकशी सुरू करण्यात आली आहे. याप्रकरणी, चौकशी समितीने जरांगे यांना पत्र देऊन ऑडीओ क्लिपची मागणी केली. त्यानंतर, जरांगे यांच्याकडून तपास यंत्रणेला ऑडिओ क्लिप देण्याची तयारी दर्शवली आहे. ऑडिओ क्लिपचा सोर्सही आपण सांगू, पण मुख्यमंत्री फडणवीस, एकनाथ शिंदे यांनी ऑडिओ क्लिप देणाऱ्याच्या जीवाला धोका होणार नाही याची शाश्वती द्यावी, असे जरांगे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटींच्या देवाण-घेवाणीचा संवाद असलेली ऑडिओ क्लिप ऐकवून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली होती. या व्हिडिओ क्लिपनंतर भाजप आणि शिवसेना यांच्यातच कलगीतुरा पाहायला मिळाला. तर, मला ५०० कोटी रुपये दिले म्हणून माझ्या नावाने भाजपाकडून कुणी पैसे घेतले, मला खरंच दिले का? असा सवालही जरांगे पाटील यांनी उपस्थित केला होता. त्यानंतर, संबंधित ऑडिओ क्लिपच्या चौकशीसाठी एसआयटी गठीत करण्यात आली असून संबंधित समितीने मनोज जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधला.

देशात ८५० विशेष न्यायालये उभारण्यास केंद्राची मंजुरी; ५ वर्षांची मुदतवाढ

नवी दिल्ली (प्रतिनिधी)- देशभरात बलात्कार आणि बालकांवरील लैंगिक अत्याचार (पॉस्को) प्रकरणांना चाप लावण्यासाठी आणि खटल्यांची जलद सुनावणी सुनिश्चित करण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने 'फास्ट ट्रॅक विशेष न्यायालय' योजनेला आणखी पाच वर्षांच्या मुदतवाढीस मंजुरी दिली आहे. ही योजना आता ३१ मार्च २०३१ पर्यंत लागू राहणार असून, या अंतर्गत देशभरातील अशा विशेष न्यायालयांची संख्या ८५० पर्यंत वाढवण्यात येणार आहे.

या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी एकूण ३,७८८.०४ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यामध्ये केंद्र सरकारचा वाटा २,३५३.१५ कोटी रुपये असणार आहे, तर उर्वरित १,४३४.८९ कोटी रुपये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून खर्च केले जातील. केंद्र सरकार आपल्या वाट्याचा निधी 'निर्भया फंडा'मधून उपलब्ध करून देणार आहे. सध्या देशभरात २९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ७७९ फास्ट ट्रॅक न्यायालये कार्यरत असून, यामध्ये ३९९ विशेष पॉस्को न्यायालयांचा समावेश आहे. न्यायालयांची संख्या वाढल्यामुळे प्रलंबित खटल्यांचा निपटारा वेगाने होण्यास मोठी मदत मिळणार आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या वन डे सामन्यात टीम इंडियाचा विजय

ईडन पार्क (वृत्तसंस्था)- भारतीय क्रिकेट संघाने पावसामुळे प्रभावित झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडवर डीएलएसनुसार ५ विकेट्सने विजय मिळवला आहे. भारताने न्यूझीलंडला ४०.२ ओव्हरमध्ये १८५ रन्सवर गुंडाळलं होतं. त्यामुळे भारताला १८६ धावांचं आव्हान मिळालं. मात्र दुसऱ्या डावात पावसाने अनेकदा खोडा घातल्याने खेळ थांबवावा लागला. त्यामुळे बराच वेळ वाया गेला. त्यामुळे भारताला डीएलएसनुसार ३२ ओव्हरमध्ये १४३ धावांचं सुधारित आव्हान मिळालं. भारताने हे आव्हान ५ विकेट्सच्या मोबदल्यात २२.४ ओव्हरमध्ये पूर्ण केलं.

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांचा दारुण पराभव

नवी दिल्ली (प्रतिनिधी)- अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांचा दारुण पराभव झाला आहे. काँग्रेसच्या सिनेट आणि प्रतिनिधीगृहामध्ये डेमोक्रेटीक पक्षाला बहुमत मिळालं आहे. प्रतिनिधीगृहात डेमोक्रेटीक पक्षांनी आतापर्यंत २१९ जागा जिंकल्या आहेत. ४३५ पैकी ३४५ जागांचे निकाल जाहीर झाला असून डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन्स पक्षाला फक्त १२६ जागा मिळाल्या आहेत. सिनेटमध्येही डेमोक्रेटीक्सना स्पष्ट बहुमत मिळाले आहे. सिनेटमध्ये रिपब्लिकन्सना फक्त ४१ जागा जिंकता आल्या. तर डेमोक्रेटीक पक्षांनी सिनेटमध्ये ५३ जागांवर विजय मिळवला.

जगातील सर्वात शक्तिशाली राष्ट्राध्यक्ष आपली महत्त्वाची परीक्षा उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. अमेरिकेच्या मध्यवर्ती निवडणुकांमध्ये ट्रम्प यांचा मोठा पराभव झाल्याचे दिसून येत आहे. केवळ डेमोक्रॅट्सनी सिनेटमध्ये बहुमत मिळवले आहे असे नाही, तर डोनाल्ड ट्रम्प यांच्या स्वतःच्या रिपब्लिकन पक्षाचे उमेदवारही त्यांच्या पारंपरिक बालेकिल्ल्यांमध्ये पराभूत झाले आहेत. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा रिपब्लिकन पक्ष पराभूत झाला आहे.

वुमन्स प्रीमियर लीग स्पर्धेच्या पाचव्या पर्वाचं बिगुल वाजलं

मुंबई (प्रतिनिधी)- वुमन्स प्रीमियर लीग २०२७ स्पर्धेसाठी नुकतीच मिनी लिलाव प्रक्रिया पार पडली होती. या लिलाव प्रक्रियेनंतर स्पर्धा कधी होणार? याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. आता या स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. ही स्पर्धा १४ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान होणार असून बीसीसीआयने बुधवारी वेळापत्रक जाहीर केलं. प्लेऑफसह डब्ल्यूपीएल २०२७ चे सर्व २२ सामने भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ७:३० वाजता सुरू होतील. ही स्पर्धा वडोदरा आणि मुंबईत होणार आहे. दोन्ही ठिकाणी प्रत्येकी ११ सामने होणार आहेत.

न्यायालयाला बॉम्बने उडविण्याच्या धमकी प्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा

नांदेड (प्रतिनिधी)- जिल्हा न्यायालय येथे बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी देणाऱ्या अज्ञात ई-मेल धारकाविरुद्ध वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २ नोव्हेंबर रोजी दुपारी अडीचच्या सुमारास जिल्हा न्यायालय, नांदेड यांच्या अधिकृत ई-मेल आयडीवर एका अज्ञात व्यक्तीने ई- मेल पाठवून त्याच दिवशी दुपारी ३.११ वाजता न्यायालयात बॉम्बस्फोट होणार असल्याची धमकी दिली होती. या धमकीमुळे न्यायालय परिसरात एकच खळबळ उडाली होती.

माहिती मिळताच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी तात्काळ आदेश देऊन विशेष पथके न्यायालयात रवाना केली.

उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर वैंजने, वजिराबाद पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अजित कुंभार, दहशतवाद विरोधी



शाखेचे (एटीबी) पोलीस निरीक्षक रणजित भोईटे, बॉम्बशोधक व नाशक पथकाच्या (बीडीडीएस) पोलीस निरीक्षक मीना तोटेवाड, पोउपनि मारोती चव्हाण यांची क्यूआरटी टीम आणि वजिराबाद पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ जिल्हा न्यायालयात धाव घेतली.

जिल्हा न्यायाधीशांच्या परवानगीने संपूर्ण न्यायालय परिसर तातडीने रिकामा करण्यात आला. त्यानंतर बीडीडीएस आणि क्यूआरटी पथकांच्या मदतीने न्यायालयाची संपूर्ण इमारत, न्यायाधीशांची दालने, वकिलांचे चेंबर्स, अभिलेख कक्ष आणि परिसराची सखोल तपासणी करण्यात आली. सुमारे दोन तास चाललेल्या या शोध मोहिमेत कोणतीही संशयास्पद वस्तू किंवा स्फोटक पदार्थ आढळून आला नाही.

तपासाअंती सदर ई-मेल हा केवळ अफवा पसरवून सार्वजनिक शांतता धोक्यात आणणे आणि कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याच्या उद्देशाने पाठवण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाणे गु.र.नं. ५४३/२०२६ कलम ३५३(२), २१२ भारतीय न्याय संहिता सह कलम ६६ (फ) माहिती तंत्रज्ञान अधिनियम (आयटी ॲक्ट) अन्वये अज्ञात ई-मेल धारकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तांत्रिक व सखोल तपास वजिराबाद पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी करीत आहेत.

सतेज पाटील जिंकूनही हरले, शासननियुक्त चार सदस्यांवर शिक्कामोर्तब

मुंबई (प्रतिनिधी)- महायुती सरकारकडून गोकुळ दूध संघावर ४ शासननियुक्त (स्वीकृत) तज्ज्ञ संचालक नेमण्याच्या निर्णयाला मंत्रिमंडळ बैठकीत मंजूरी देण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर या ४ स्वीकृत सदस्यांना सहकारी संस्थांवर मतदानाचा अधिकारही देण्यात आला आहे. सध्या गोकुळमध्ये सतेज (बंटी) पाटील यांच्या गटाचे बहुमत आहे. परंतु सरकारने बाहेरून हे ४ सदस्य नियुक्त करून त्यांना मतदानाचा अधिकार दिल्यास गोकुळच्या अध्यक्ष निवडीचे चित्र बदलू शकतं. त्यामुळे या निर्णयाला महाविकास आघाडी विशेषतः सतेज पाटील यांच्याकडून तीव्र विरोध करण्यात येत आहे. ही लोकशाहीची गळचेपी असल्याची टीका सतेज पाटील यांनी केली होती.

जिल्ह्यातील ५४,९१० शेतकऱ्यांच्या खात्यात ५५४.८४ कोटी रुपये जमा

आतापर्यंत नांदेडच्या १.५७ लाख शेतकऱ्यांना १,४१६ कोटींची कर्जमुक्ती

नांदेड (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील ५४ हजार ९१० पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांवर आज ५५४ कोटी ८४ लाख रुपयांची कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. यापूर्वीच्या लाभार्थ्यांसह जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १ लाख ५७ हजार १२८ पात्र शेतकऱ्यांना १ हजार ४१६ कोटी ४० लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे.

या योजनेंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेले आणि ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज व पुनर्गठित अथवा फेरपुनर्गठित कर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येत आहे.




योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, त्यासाठी शासनाने महाआयटीची नियुक्ती केली आहे. महाआयटीने विकसित केलेल्या योजना प्रणालीवर नांदेड जिल्ह्यातील बँकांनी एकूण २ लाख २४ हजार ८४७ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. संगणकीय प्रक्रियेनंतर २४ जुलै, ११ सप्टेंबर, १२ ऑक्टोबर आणि २२ ऑक्टोबर २०२६ रोजी पात्र शेतकऱ्यांच्या चार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख २ हजार ७३ शेतकऱ्यांची नावे आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली असून, त्यापैकी १ लाख ६४ हजार ८०६ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. यापूर्वी १ लाख २ हजार २१८ पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांवर ८६१ कोटी ५६ लाख रुपये जमा करण्यात आले होते. त्यानंतर आज ४ नोव्हेंबर रोजी आणखी ५४ हजार ९१० पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांवर ५५४ कोटी ८४ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत. त्यामुळे आतापर्यंत आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांपैकी एकूण १ लाख ५७ हजार १२८ लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाला आहे.

जिल्ह्यातील ज्या पात्र शेतकऱ्यांनी अद्याप आधार प्रमाणीकरण केलेले नाही, त्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी तपासून नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे. आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येणार आहे.

तसेच या योजनेचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना बँकांनी नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेमुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून दिलासा मिळत असून, त्यांना आगामी हंगामासाठी आर्थिक आधार मिळणार आहे.



दीपावलीच्या स्वागतासाठी बाजारपेठा सजल्या!

खरेदीसाठी नागरिकांची गर्दी; पणत्या, आकाशकंदील, विद्युत रोषणाई आणि पूजेच्या साहित्याला मोठी मागणी

नायगाव बाजार (प्रतिनिधी)- प्रकाश, मांगल्य आणि आनंदाचा संदेश देणाऱ्या दीपावली सणाचे आगमन अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने नायगाव आणि नरसी शहरांतील बाजारपेठा उत्साहाने फुलल्या आहेत. सणाच्या पार्श्वभूमीवर मुख्य बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून, सर्वत्र दीपावलीच्या स्वागताची लगबग पाहायला मिळत आहे. रंगीबेरंगी आकाशकंदील, आकर्षक विद्युत रोषणाई आणि विविध सजावटीच्या साहित्याने बाजारपेठांना उत्सवी स्वरूप प्राप्त झाले आहे.

दीपावली म्हणजे अंधारावर प्रकाशाचा, निराशेवर आनंदाचा आणि अमंगलावर मांगल्याचा विजय मानणारा भारतीय संस्कृतीतील महत्त्वाचा सण. या सणाच्या स्वागतासाठी घराघरांत स्वच्छता, रंगरंगोटी आणि सजावटीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. लक्ष्मीपूजनासाठी लागणारे साहित्य, मातीचे पारंपरिक दिवे, पणत्या, रांगोळी, तोरणे, आकाशकंदील, विद्युत माळा तसेच पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी महिला आणि पुरुषांची बाजारपेठेत गर्दी होत आहे.



विशेषतः पारंपरिक मातीच्या पणत्या आणि विविध आकर्षक आकारांतील आकाशकंदिलांना ग्राहकांची पसंती मिळत आहे. बदलत्या काळानुसार बाजारपेठेत आधुनिक विद्युत सजावटीच्या साहित्याचेही विविध प्रकार उपलब्ध झाले आहेत. लहान मुलांमध्ये फटाके, कंदील आणि आकर्षक सजावटीच्या वस्तूंचे विशेष आकर्षण दिसून येत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

ट्रम्पः करावे तसे भरावे

जसे करावे तसे भरावे असे आपल्याकडे म्हटले जाते त्याची प्रचिती आता अमेरिकेत आली आहे. अमेरिकेतील ३ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या मध्यावधी निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाने प्रतिनिधिगृह आणि सिनेट या दोन्ही सभागृहांमध्ये बहुमत मिळवून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा राजकीय धक्का दिला आहे. अभी विकी आणि दिशाही नेतृत्व म्हणून ज्यांची खूप प्रसिद्धी जगात झाली अशा सत्ताधारी पक्षाचा कॅन्सस, टेक्सास, आयोवा, ओहायो, मेन आणि नॉर्थ कॅरोलिनासारख्या पारंपरिक रिपब्लिकन प्रभावाच्या राज्यांमध्येही डेमोक्रॅटिक पक्षाने विजय मिळवला. जागतिक राजकारणात मैत्रीची भाषा बोलणाऱ्या राष्ट्रांच्या धोरणांमागे अनेकदा आर्थिक आणि सामरिक हितसंबंध दडलेले असतात. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भारतविषयक धोरणातून याची प्रचिती आली. भारताशी मैत्रीचे संबंध असल्याचे सांगतानाच व्यापार शुल्क, ऊर्जा आयात, कृषी बाजारपेठ आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारतावर दबाव आणण्याचे प्रयत्न झाले. मात्र, अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकीच्या निकालाने ट्रम्प यांच्या आक्रमक राजकारणालाच मतदारांनी चपराक दिली आहे. प्रतिनिधिगृह आणि सिनेट या दोन्ही सभागृहांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाने मिळवलेले बहुमत हा केवळ सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाचा पराभव नाही, तर ट्रम्प यांच्या कार्यपद्धतीवरील जनतेच्या नाराजीचा स्पष्ट कौल आहे. ट्रम्प यांच्या पराभवामागे अनेक कारणे आहेत. त्यामध्ये सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे महागाई आणि वाढता जीवनावश्यक खर्च. अमेरिकेतील नागरिकांना अन्नधान्य, इंधन, आरोग्यसेवा आणि घरांच्या किमतींचा वाढता बोजा जाणवत आहे. अर्थव्यवस्थेबाबत मोठमोठे दावे करूनही सामान्य नागरिकांच्या जीवनमानात अपेक्षित सुधारणा न झाल्याने सरकारविरोधी असंतोष वाढला. निवडणुकीतील प्रचारात डेमोक्रॅटिक पक्षाने महागाई, रोजगार आणि सामान्य कुटुंबांच्या आर्थिक अडचणी हे मुद्दे प्रभावीपणे मांडले. त्यातच इराणविरुद्धच्या युद्धामुळे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. युद्धाचा आर्थिक भार, इंधनाच्या किमतींवरील परिणाम आणि अमेरिकेच्या जागतिक भूमिकेबाबत निर्माण झालेली अस्वस्थता मतदारांच्या नाराजीचे कारण ठरली. याशिवाय ट्रम्प प्रशासनातील भ्रष्टाचाराचे आरोप, सत्तेचा वापर, सामाजिक सुरक्षा योजनांमधील कपातीबाबतची चिंता आणि राजकीय विरोधकांशी संघर्षाची भूमिका यांमुळेही त्यांच्या प्रतिमेला धक्का बसला. विशेष म्हणजे, ट्रम्प यांनी पाठिंबा दिलेल्या अनेक उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. यावरून त्यांच्या लोकप्रियतेचा प्रभावही कमी झाल्याचे स्पष्ट होते. अमेरिकेतील हा निकाल भारतासाठीही महत्त्वाचा आहे. ट्रम्प यांनी व्यापारातील तूट कमी करण्याच्या नावाखाली भारतावर आयात शुल्काचा दबाव आणला. अमेरिकेचे हित महत्त्वाचे असेल, तर भारताचे हितही तितकेच महत्त्वाचे आहे. अमेरिकेला आपल्या उद्योगांचे संरक्षण करण्याचा आणि रोजगार वाढविण्याचा अधिकार आहे; परंतु त्यासाठी दुसऱ्या देशाच्या आर्थिक सार्वभौमत्वाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. व्यापारविषयक मतभेद चर्चेतून सोडविण्याऐवजी शुल्कवाढीचे अस्त्र वापरणे हे मुक्त व्यापाराच्या तत्त्वांशी विसंगत आहे. कृषी क्षेत्र हा भारतासाठी विशेष संवेदनशील विषय आहे. अमेरिकेतील कृषी उत्पादनांसाठी भारतीय बाजारपेठ अधिक खुली करण्याच्या मागणीचा विचार करताना देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांचे हित दुर्लक्षित करता येणार नाही. अमेरिकेतील शेतीचे यांत्रिकीकरण, उत्पादनक्षमता आणि अनुदानांची रचना भारतापेक्षा वेगळी आहे. भारतातील अल्पभूधारक शेतकरी उत्पादन खर्च, अनिश्चित पाऊस आणि बाजारभावातील चढ-उतारांशी झुंजत आहेत. अशा परिस्थितीत आयात शुल्कात मोठी कपात केल्यास स्थानिक शेतकऱ्यांसमोर असमान स्पर्धेचे आव्हान उभे राहू शकते. त्यामुळे व्यापार करार करताना अन्नसुरक्षा आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न यांना सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. ऊर्जा सुरक्षेचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्याचा निर्णय भारताने आपल्या ऊर्जा गरजा, आंतरराष्ट्रीय बाजारातील किमती आणि पुरवठ्याची सुरक्षितता लक्षात घेऊन घेतला आहे. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात इंधनाच्या किमती वाढल्यास त्याचा परिणाम वाहतूक, शेती, उद्योग आणि सर्वसामान्यांच्या जीवनमानावर होतो. त्यामुळे तेल आयातीसंबंधीचे निर्णय केवळ अमेरिकेच्या राजकीय भूमिकेनुसार घेणे योग्य ठरणार नाही. आंतरराष्ट्रीय कायदे आणि निर्बंधांचा आदर राखतानाच भारताने आपली सामरिक स्वायत्तता जपली पाहिजे. तंत्रज्ञान आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीतही भारताने सावध भूमिका घेणे आवश्यक आहे. एलन मस्क यांच्या स्टारलिंकसारख्या परदेशी कंपन्यांना भारतीय बाजारपेठेत संधी देताना माहितीची सुरक्षितता, कायदेशीर उत्तरदायित्व आणि राष्ट्रीय सुरक्षेचे निकष पाळले गेले पाहिजेत. परदेशी गुंतवणुकीचे स्वागत करताना भारतीय नियमांशी तडजोड होऊ नये. अमेरिकेतील निवडणूक निकालाचा आणखी एक महत्त्वाचा अर्थ म्हणजे लोकशाहीत कोणताही नेता जनतेपेक्षा मोठा नसतो. ट्रम्प यांनी आपल्या लोकप्रियतेच्या जोरावर रिपब्लिकन पक्षावर वर्चस्व निर्माण केले होते. संपूर्ण जगामध्ये त्यांनी दादागिरी करून लोकांना त्रासून सोडले होते. पण त्यासोबतच त्यांचे महागाई, युद्ध, प्रशासनाविषयीची नाराजी आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे झालेले दुर्लक्ष यांमुळे मतदारांनी सत्ताधारी पक्षाला नाकारले. मध्यावधी निवडणुका या सत्ताधारी राष्ट्राध्यक्षांच्या धोरणांवरील जनमताचा कौल ठरू शकतात, हे या निकालाने पुन्हा सिद्ध केले. या निकालामुळे अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणात सत्तासंतुलन बदलणार असून ट्रम्प यांच्या उर्वरित कार्यकाळात विरोधी पक्षाचा प्रभाव वाढणार आहे. त्यांच्या धोरणांना संसदेतील विरोधाचा सामना करावा लागेल. मात्र, याचा अर्थ अमेरिकेचे भारतविषयक धोरण लगेच बदलेल असे नाही. अमेरिकेची परराष्ट्रनीती ही केवळ एका राष्ट्राध्यक्षावर अवलंबून नसते. त्यामुळे भारताने या राजकीय बदलांकडे संधी म्हणून पाहावे; परंतु कोणत्याही एका पक्षाच्या सत्तेवर अवलंबून राहू नये. भारत-अमेरिका संबंध व्यापारापुरते मर्यादित नाहीत. संरक्षण, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेच्या क्षेत्रांत दोन्ही देशांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे संघर्षाऐवजी संवाद आणि समानतेच्या तत्त्वावर संबंध पुढे नेण्याची गरज आहे. त्याचवेळी देशांतर्गत उत्पादनक्षमता वाढविणे, संशोधनाला चालना देणे, निर्यातीसाठी पर्यायी बाजारपेठा शोधणे आणि ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबन मिळविणे आवश्यक आहे. अमेरिकेतील जनतेने ट्रम्प यांच्या राजकारणाला दिलेला नकार भारतासाठीही एक संदेश आहे. महासत्तेचे सामर्थ्य कितीही मोठे असले, तरी लोकशाहीत जनतेच्या प्रश्नांपेक्षा सत्ताधाऱ्यांची महत्त्वाकांक्षा मोठी ठरू शकत नाही. भारताने अमेरिकेशी मैत्री ठेवावी, सहकार्य वाढवावे आणि व्यापारही वृद्धिंगत करावा; मात्र त्यासाठी राष्ट्रीय हिताची किंमत मोजू नये. भारत कोणत्याही महासत्तेच्या विरोधासाठी विरोध करणारा देश नाही आणि कोणाच्याही दबावाखाली झुकणाराही नाही. मैत्री समानतेच्या पायावर आणि व्यापार परस्पर सन्मानाच्या आधारावरच असला पाहिजे. हाच भारताच्या परराष्ट्र धोरणाचा खरा कस आहे!

गोपालनाचे आणि गोरक्षणाचे महत्त्व सांगणारी 'वसुबारस'

दीपावलीतील पाहिला सण 'वसुबारस'. आश्विन कृष्ण द्वादशीस हा सण साजरा केला जातो. या दिवशी गोधनाची पूजा केली जाते. समुद्रमंथनातून पाच कामधेनू उत्पन्न झाल्या होत्या त्यापैकी नंदा नामक धेनूस उद्देशून हे व्रत केले जाते. अनेक जन्माच्या कामना पूर्ण व्हाव्यात याकरिता वासरासहित गायीची या दिवशी पूजा केली जाते. भारत हा पूर्वीपासून कृषिप्रधान देश असल्याने गोपालनाचे महत्व लोकांवर आधीपासूनच बिंबले आहे. गाईच्या पोटात ३३ कोटी देव असतात असे लहानपणी सांगितले जाई. त्यामुळे गाय दिसली की तिच्या उदराला स्पर्श करून नमस्कार करण्याचा संस्कारच मुलांवर झालेला असे. गाय आणि तिच्या वासरांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक दिली जाई. आज मात्र परिस्थिती बदलली आहे. गेल्या काही वर्षांत देशी गाईंच्या संख्येत कमालीची घट झाली आहे. धनाची निकड भागवण्यासाठी शेतकरी गोधन कसायाला विकू लागला आहे. सरकारने गाईंच्या सन्मानार्थ तिला राज्यमातेचा दर्जा तर दिला आहे; मात्र तिच्या रक्षणासाठी आणि संवर्धनासाठी कोणतेही ठोस धोरण आखलेले नाही परिणामी राज्यात गाईंची संख्या प्रतिदिन घटतच आहे.

गोवंशाने भरलेल्या गाड्या पोलिसांकडून किंवा गोरक्षकांकडून पकडल्या गेल्याच्या बातम्या हल्ली प्रतिदिन वृत्तपत्रात वाचायला मिळतात. त्यामुळे राज्यात खरोखर गोवंश हत्याबंदी कायदा आहे का, असा प्रश्न पडतो. जर कायदा अस्तित्वात आहे तर गुन्हेगारांना त्याचे भय का वाटत नाही? राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा अस्तित्वात येऊन आज ११ वर्षांहून अधिक काळ लोटला; मात्र या कायद्यान्वये कोणाला शिक्षा झाल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा असला तरी गोहत्या थांबलेल्या नाहीत. राज्यात अनेक ठिकाणी आजही प्रतिदिन गोवंश कापले जातात. हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात



आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय.

कोणतेही शुभकार्य असो किंवा धार्मिक पूजाविधी असो गोग्रास दिल्याशिवाय ते पूर्ण होतच नाही. स्थानाची आणि वास्तूची शुद्धी करण्यासाठी गोमूत्र शिंपडले जाते. यज्ञादी विधीच्या ठिकाणी सात्विकता निर्माण व्हावी यासाठी तेथील भूमी गाईच्या शेणाने सारवली जाते. गोमातेच्या दुधाला तर अमृताची उपमा दिली जाते. लहान बाळाला आई नंतर पहिले दूध गाईचेच दिले जाते. गायीच्या दुधाचे महत्व शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. गाईच्या दुधापासून अनेक दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती केली जाते ज्यातून गोपालन करणाऱ्याला वर्षभर उत्पन्न मिळते. देशी गाईचे तूप हे अनेक आजारांवर अत्यंत गुणकारी मानले जाते. गाय ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे त्यामुळे ती उपयुक्त आणि श्रद्धेय का आहे याचा उल्लेख प्राचीन धर्मग्रंथांत आढळतो. वसिष्ठ ऋषींनी गोमातेवर संशोधन करून गाईच्या अनेक प्रजाती निर्माण केल्या. गोपालनाचे महत्त्व साक्षात भगवान श्रीकृष्णाने स्वतः गोपालन करून दर्शवले आहे. दत्तगुरुंनीही गोमातेची महती वर्णिली आहे. छत्रपती शिवरायांनी गोहत्येसाठी सरसावणारे कसायाचे हात जागेवर कलम करून गोरक्षणाचे महत्व रयतेवर बिंबवले होते. महाराजांनी हिंदवी स्वराज्यात गोपालनाला विशेष महत्व दिले. त्यामुळेच महाराजांना गोब्राह्मण प्रतिपालक म्हटले जाते. पंजाब केसरी महाराजा रणजीत सिंह यांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्यात गोहत्या करणाऱ्याला मृत्युदंडाच्या शिक्षेचे प्रावधान केले होते. रामचंद्र बीर यांनी गोहत्या थांबवण्यासाठी ७० दिवस उपवास केला होता. हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि अध्यात्मिक संप्रदाय यांनी केलेल्या अथक पाठपुराव्यानंतर राज्यात गोवंश हत्याबंदी विधयेक आणण्यात आले; मात्र आज-मितीला त्याच्या अंमलबजावणीमध्ये कमालीची ढिलाई दिसून येत आहे.

तुळशी वृन्दावनाला प्रदक्षिणा घातल्यावर ज्याप्रमाणे शरीरात सकारात्मक ऊर्जा तयार होते त्याप्रमाणे गाईला प्रदक्षिणा घातल्या तरी आपल्या शरीरारात तेव्हढ्याच प्रमाणात सकारात्मक ऊर्जा तयार होत असल्याचे युनिव्हर्सल स्कॅनर मापन यंत्राद्वारे करण्यात आलेल्या परीक्षणातून सिद्ध झाले आहे. ज्या भागात अधिक प्रमाणात गोहत्या होतात त्या भागात भूकंप होतात असे एका निरीक्षणातून सिद्ध झाले आहे. गाईला पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र जाणवते त्यामुळे चरताना आणि विश्रांती घेत असताना गाय नेहमी दक्षिणोत्तर असते. नवजात गोवंशाच्या आवाजाच्या ऐकण्यामुळे मानसिक आजारांमध्ये सकारात्मक बदल होत असल्याचेही प्रयोगातून सिद्ध झाले आहे. गाईच्या पाठीच्या कण्यातील सूर्यकेतु मज्जातंतू हानिकारक किरणोत्सर्गाला रोखून पर्यावरण स्वच्छ ठेवते. अशा कितीतरी प्रयोगांतून देशी गाईची उपयुक्तता सिद्ध झाली आहे.

वाढत्या गोहत्येमुळे आज देशी गाईंची संख्या कमालीची घसरली आहे. देशी गाईच्या अनेक प्रजाती लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. अधिक दुधाच्या हव्यासाने आज अनेकजण संकरित गाईचे पालन करत आहेत मात्र संकरित गाईच्या दुधात देशी गाईप्रमाणे कोणतीच उपयुक्त तत्वे नसतात. आजमितीला राज्यात असेही उद्योजक आहेत ज्यांनी देशी गाईंचे महत्व ओळखून त्यांचे पालन करून गाईच्या दूध, शेण आणि गोमूत्र यांच्या विक्रीतून कोट्यवधींचा व्यवसाय उभा केला आहे. यातून इतरांनीही प्रेरणा घ्यायला हवी. राज्य सरकारने गोशाळांसाठी अनुदान देण्याची योजना तर आखली आहे; मात्र त्याचा लाभ फारच कमी गोशाळांना मिळतो. परिणामी अनेक गोशाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. यंदा राज्यातील बहुतांश भागांत दुष्काळ पडल्याने गोशाळांतील गोवंशांना जगवण्यासाठी चारा उपलब्ध करून देणे मोठे आव्हान ठरणार आहे. गोशाळा बंद पडल्या तर भविष्यात यांतील गोवंशाच्या चारा-पाण्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. छत्रपतींच्या राज्यात गोमातांवर ओढवलेली ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. राष्ट्रीय स्तरावर गोवंश हत्याबंदी कायदा करण्याची मागणी मागील अनेक वर्षांपासून केली जात आहे मात्र राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. गोमाता जसे हिंदूंचे श्रद्धास्थान आहे तशी ती सर्वांत उपयुक्त प्राणी असल्याचेही जागतिक स्तरावर सिद्ध झाले असताना गायीच्या रक्षणाचे कोणतेच प्रावधान केंद्र शासनाने आजतागायत केलेले नाही. देशात अशीच गोहत्या होत राहिली तर उद्या नावालाही गोवंश शिल्लक राहणार नाही.

-जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

समग्र समाजाचे मनोबल उंचावणे, ही खरी उन्नती



एकविसाव्या शतकात विलक्षण वेगाने विज्ञानाची प्रगती होत आहे. त्यामुळे मानवी जीवनात अमुलाग्र बदल होतांना दिसत आहे. निसर्ग नियमाचा सखोल अभ्यास करुन त्या ज्ञानाचा उपयोग मानवी जीवन प्रगल्भ करण्यासाठी शास्त्रज्ञ करु शकतात. नव्हे ते करुन दाखवण्याची अलौकीक कामगिरी शास्त्रज्ञांनी केली आहे. भविष्यात याही पुढे जाऊन मानवी जीवन संपन्न बनविण्यासाठी संशोधन केले जाईल. त्यासाठी उगवत्या पिढीला परिपूर्ण विज्ञान शिक्षण मिळणे खूप गरजेचे झाले आहे. भविष्यातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, प्रत्येक क्षेत्रातील कुशल कारागीर, त्यासोबतच विज्ञाननिष्ठ, विवेकनिष्ठ समाजाची निर्मिती, ज्ञान, विज्ञानाची ओढ उगवत्या पिढीच्या मनात निर्माण व्हावी. ती वर्तनात दिसावी. तसे झाल्यास सर्व समाजमनातील विज्ञान, संशोधनातील गैरसमज दूर होतील. त्यामुळे जनमानसात सत्यशोधक वृत्ती निर्माण होईल. सर्व क्षेत्रात प्रगतीच्या वाटा मोकळ्या होतील. त्याने मानवी जीवन सुखी बनेल. हे सर्व बदल स्वीकारण्यासाठी आपले मनोबल उंचावणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्यातील मन, भावना, विचार मुक्तपणे व्यक्त करणे महत्वाचे असते.

आपण स्वतःला ओळखण्यासाठी व्यक्त होणे खूप गरजेचे असते. व्यक्त न होण्यात खूप शहाणपणा असतो, पण हे नेहमीच खरे आहे का? 'मौनं सर्वत्र साधनं' मौन पाळल्याने सर्व कार्य पूर्ण होतात. असे सदैव मौन पाळणारे लोक सांगत असतात. मौनाचे ते नेहमीच समर्थन करतांना दिसतात. पण मनुष्य वर्तन नियम स्थल काल व्यक्तीपरत्वे बदलतात. याचीही जाण असली पाहिजेत. त्यामुळे मनोबल उंचावण्यासाठी योग्य वेळी, योग्य शब्दात व्यक्त होता आले पाहिजे. नेहमीच मूग गिळून गप्प बसणे किंवा तोंड दाबून बुक्क्याचा मार खाणे, म्हणजे वाणी असून मुकेपणाच्या वेदना सहन करणेच होय. मानवी जीवनात आपले विचार, भावना व्यक्त करण्यासाठी आपल्याला एवढी उत्तम संधी असतांना असे मुक्याच्या भूमिकेत जगणे कितपत योग्य? हा प्रश्न सदैव मौन पाळणाऱ्या आणि त्यातच खूप मोठे चातुर्य आहे, असे समजणाऱ्या महान व्यक्तीत्वानी स्वतःला विचारला पाहिजे. या प्रकारचे आत्मपरीक्षण करणे म्हणजे मौनभंग करणे नव्हे. हे या ठिकाणी मुद्दाम नमूद केले पाहिजे. अशा माणसांच्या जीवनात एक गम्मत असते. आपल्याला जास्त बोलायला आवडत नाही म्हणून घरातल्या कोणीच जास्त बोलू नये. असा दंडकच त्यांनी घालून दिलेला असतो. त्यामुळे त्यांनी घरात प्रवेश करताच घराची बंदीशाळा होते. नसता बाबा घरात येताच मुले बाहेर. या ठिकाणी विनोदाने असे नमूद करावसे वाटते की सर्व मुलांनी बाहेर जावे, यासाठीच हा दंडक घालून दिलेला असतो का?

विनोदबुद्धीने असे काही वक्तव्य करणे, हे आपण समजू शकतो, पण त्याचे दुष्परिणाम समजून घेतले पाहिजे. मुलांनी इतर मुलासोबत खेळावे, बागडावे, थोडा मुक्त संचार करावा. हे मानसशास्त्रीयदृष्ट्या अगदी योग्य असले तरी, यासाठी बंदी आणणारे अनेक पालक आपण पहातो. त्यांनी हसाव की नाही, रडावं की नाही? यावरही बंदी. अनेक विनोदी लेखक, वक्ते आणि हास्यसम्राटांनी विनोदाचे महत्व पटवून दिले आहे. तसे साने गुरुजी सारख्या भावनाप्रधान लेखकाने मुक्तपणे रडून मोकळे होण्याचे महत्व सुद्धा विशद केले आहे. रडणे ही एक नैसर्गिक आणि मानवी क्रिया आहे. संशोधनानुसार योग्य प्रमाणात रडण्यामुळे मानसिक तणाव कमी होतो. रडतांना शरीरातील तणाव संप्रेरक (कॉर्टिसॉल स्ट्रेस हार्मोन्स) अश्रुवाटे बाहेर पडतात. मेंदूमधील आनंदी ठेवणारे घटक स्त्रवतात. त्यामुळे मन शांत होते. डोळ्यातील धूळ, हानिकारक कण नैसर्गिक रित्या बाहेर पडतात. डोळे स्वच्छ होतात. अश्रू डोळ्यांना वंगण पुरवितात. ज्यामुळे डोळे कोरडे होत नाहीत. जळजळ थांबते. मज्जासंस्था शांत होऊन शरीराला विश्रांती मिळते. मानसिक ताण कमी होऊन झोपेची गुणवत्ता सुधारते. भावनाचे प्रगटीकरण होते. मनाला भावनिक आधार मिळतो. (त्याचे प्रमाण अधिक असल्यास मात्र त्याचे असंख्य तोटेही असतात.)

यासोबतच हसण्याचे फायदेही समजून घेतले पाहिजेत. हसण्यामुळे शरीरात ताण निर्माण करणारे ग्रंथिरस (हार्मोन्स) कमी होतात. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. रोगप्रतिकारक पेशी सक्रिय होतात. त्यामुळे आजारांशी संघर्ष करण्यास शरीर सक्षम होते. रक्ताभिसरण सुधारते. रक्तवाहिन्या मोकळ्या होतात.हृदयविकाराचा धोका कमी होतो. मनमोकळे झाल्याने शरीर प्राणवायू अधिक प्रमाणात घेते. त्यामुळे हृदय, फुफ्फुसे आणि स्नायू उत्तेजित होतात. हसण्यामुळे शरीरातील वेदना आणि अस्वस्थता कमी होते. हसण्यामुळे मेंदूत आनंद देणारे रसायन (डोपामाईन) तयार होते. चेतातंतू रसायण (न्यूरोकेमिकल्स) वाढतात. ते मनाला अधिक प्रसन्न करतात. मनाच्या प्रसन्नतेने मेंदूची कार्यक्षमता, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती आणि प्रतिभाशक्ती वाढते. मानसिक ताण, नैराश्य घालवून निर्भयता वाढविण्यासाठी हास्य खूप प्रभावी ठरते. हास्याने संवाद वाढतो. विश्वास निर्माण होतो. परस्पर संबंध दृढ होतात. जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होतो. कठीण प्रसंगाचा सामना करण्यासाठी मनोबल वाढते. (अति हसण्याचे मात्र शारीरिक मानसिक तोटेही असतात.)

या ठिकाणी प्रमुख्याने आपणास हा विचार करणे गरजेचे आहे. योग्य प्रमाणात हसणे आणि रडण्यावर बंदी आणून पालक आपल्या पाल्याचे, कोणत्या प्रकारचे नुकसान करत असतात. मुलांच्या नैसर्गिक भावना दाबून टाकल्याने मुलांची अशी मनोवृत्ती निर्माण होते, व्यक्त होण्यापेक्षा अव्यक्त अवस्थाच चांगली. बालपणी मुले भीतीमुळे व्यक्त होत नाहीत. मोठी झाल्यावर त्यांनी व्यक्त व्हावं, ही पालकाची अपेक्षा असते. तेंव्हा मुलं पालकाजवळ व्यक्त होत नाहीत. पालक आणि मुलातील संवाद सिमित होतो. उदा. मला या महिण्यात एवढे पैसे पाहिजेत. इतकेच बोलून संवाद संपतो. यातून पालकाची चिंता वाढते. मुलं मोकळ्या मनाने का बोलतं नाहीत? हा यक्ष प्रश्न पालकाच्या मनात निर्माण होतो. उत्तर सापडत नाही. पालकाशी अधिक संवाद करायचा नाही. हा मुलांचा संकल्प तयार होतो. हा सुसंवाद नष्ट होण्याचे अनेक तोटे असतात. त्याचे दुष्परिणाम आज बहुतांश समाज भोगतो आहे. सुसंवाद होण्यासाठी मैत्रीपूर्ण संबंध उभय पक्षात निर्माण झाले पाहिजेत. त्यामुळे पालक आणि मुलांचे मनोबल वाढेल. त्याचा लाभ कुटुंब व्यवस्थेला मिळेल. त्यामुळे समाज आणि राष्ट्र बळकट होईल. ही जाण आम्हाला केंव्हा येईल? पण ती येणे गरजेचे आहे. आपली उगवती पिढी कुटुंब व्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. ती समाजाची आणि राष्ट्राची मानवी संपत्ती आहे. ती घडवताना आपण किती सतर्क असावे? कुंभार मातीचा घडा तयार करताना किती सतर्क असतो? आपण तर आपली भावी पिढी घडवतो. त्यावेळी आपण किती सतर्क असावे? यावर मनापासून विचार करायला आम्ही सिद्ध झालो पाहिजे. किमान सुशिक्षित पालकांनी त्याविषयी अधिक जागरुक असावे. सोबतच अज्ञानी पालकांना योग्य दिशा देण्याची जबाबदारी कोणाची? हे सांगण्याची आवश्यक्ता नाही. आत्मकेंद्री न होता सुशिक्षित पालकाने मुक्तपणे सर्वापर्यंत आपल्या जवळील ज्ञानमार्ग पोहचविला पाहिजे. ते आत्मिक समाधान अवर्णनीय. मनोबल उंचावण्याचेच ते लक्षण होय. त्याची वृद्धी व्हावी. त्यातूनच समग्र समाजाची उन्नती होईलं. राष्ट्रसंपन्नतेचा मार्ग यातूनच प्रशस्त होईल.

-प्रा. वसंत गिरी
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

पर्यावरण जपले तरच भविष्य सुरक्षित!



पर्यावरण जागरूकता ही काळाची गरज आहे. निसर्ग हा केवळ मानवी जीवनाचा आधार नाही, तर तो संपूर्ण सृष्टीच्या अस्तित्वाचा श्वास आहे. हवा, पाणी, माती, वृक्ष, पशुपक्षी आणि जैवविविधता या निसर्गाच्या घटकांवर मानवी जीवनाची उभारणी झाली आहे. मात्र विकासाच्या अमर्याद हव्यासापोटी माणूस याच निसर्गाचा विनाश करू लागला आहे. त्यामुळे आज पर्यावरण संवर्धन हा केवळ चर्चेचा विषय राहिलेला नसून तो मानवी अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे.

एकेकाळी निसर्गाच्या सान्निध्यात वाढणारा माणूस आज निसर्गापासून दूर जात आहे. गावोगावी कमी होत चाललेली वृक्षसंपदा, सिमेंटच्या जंगलात हरवणारी हिरवळ, प्रदूषित नद्या, आटत चाललेले जलस्रोत, वाढते तापमान आणि अनियमित पाऊस ही बदलत्या पर्यावरणाची स्पष्ट लक्षणे आहेत. कधी अतिवृष्टी, तर कधी दुष्काळ; कधी उष्णतेच्या लाटा, तर कधी अवकाळी पाऊस, अशा नैसर्गिक संकटांचा सामना समाजाला करावा लागत आहे. याचा सर्वाधिक फटका यावर्षी जाणवत आहे. त्यातल्यात्यात शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा फटका बसत आहे.

विकास आवश्यक आहे; मात्र विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश होणे योग्य नाही. रस्ते, इमारती, उद्योग आणि नागरीकरण यांची उभारणी करताना पर्यावरणाचा समतोल राखणे तितकेच महत्त्वाचे आहे.वृक्षतोड करून विकासाचे स्वप्न पाहणे म्हणजे स्वतःच्या भविष्याची सावलीच नष्ट करण्यासारखे आहे. डोंगर, जंगल, नद्या आणि जैवविविधता ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून पुढील पिढ्यांची अमूल्य ठेव आहे.पर्यावरण संवर्धनासाठी केवळ शासनाच्या योजना किंवा कायदे पुरेसे ठरणार नाहीत. त्यासाठी प्रत्येक नागरिकाच्या जीवनशैलीत बदल होणे आवश्यक आहे.पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाच्या पाण्याचे संकलन, प्लास्टिकचा मर्यादित वापर, कचऱ्याचे वर्गीकरण, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सौरऊर्जेचा वापर आणि वृक्षलागवडीबरोबरच लावलेल्या झाडांचे संगोपन अशा छोट्या कृतींतून मोठा बदल घडू शकतो. झाड लावण्यापेक्षा ते जगविण्याची जबाबदारी अधिक महत्त्वाची आहे.

या संदर्भात शाळांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांना केवळ पर्यावरणावरील धडे शिकवून चालणार नाही, तर त्यांना निसर्गाशी जोडणारे प्रत्यक्ष अनुभव द्यावे लागतील.शालेय परिसरात वृक्षसंवर्धन, पाणी बचत, स्वच्छता, परसबाग, पक्ष्यांसाठी पाणपोई आणि प्लास्टिकमुक्त परिसर असे उपक्रम राबविले पाहिजेत.पर्यावरणपूरक संस्कार बालपणापासून रुजले, तर भविष्यात जबाबदार नागरिक घडतील. कारण पर्यावरणाचे रक्षण करणारी पिढी घडविणे हीच खऱ्या अर्थाने शिक्षणाची सामाजिक फलश्रुती आहे.

आज पर्यावरणाचा प्रश्न हा कोणत्याही एका व्यक्तीचा, गावाचा किंवा देशाचा राहिलेला नाही. तो जागतिक स्वरूपाचा आहे. हवामान बदलाचे परिणाम सीमारेषा ओळखत नाहीत. त्यामुळे स्थानिक पातळीवरील कृती आणि जागतिक पातळीवरील सहकार्य या दोन्हींची गरज आहे. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि नागरिक यांनी एकत्रितपणे पर्यावरण संवर्धनाची चळवळ उभी करणे आवश्यक आहे. आपल्या पूर्वजांनी निसर्गाला देवत्व दिले, वृक्षांना जीवनदायी मानले आणि नद्यांना माता म्हणून पूजले. त्या परंपरेमागे निसर्गाबद्दलची कृतज्ञता आणि संवर्धनाची जीवनदृष्टी होती. आज पुन्हा त्याच विचारांची नव्या काळाशी सांगड घालण्याची गरज आहे. निसर्गाकडून केवळ घेण्याची वृत्ती सोडून त्याला काहीतरी परत देण्याची मानसिकता विकसित झाली पाहिजे.

शेवटी, पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या घोषणा करण्यापेक्षा प्रत्येकाने आपल्या घरापासून, शाळेपासून आणि गावापासून सुरुवात करणे आवश्यक आहे. आज आपण निसर्गासाठी घेतलेला एक छोटासा निर्णय उद्याच्या पिढीचे भविष्य सुरक्षित करू शकतो. पृथ्वी ही आपली मालमत्ता नसून पुढील पिढीकडून घेतलेली अनमोल ठेव आहे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे. निसर्ग वाचला तरच माणूस वाचेल आणि पर्यावरण टिकले तरच विकासाला खरा अर्थ प्राप्त होईल. म्हणूनच पर्यावरण जागरूकता ही केवळ काळाची गरज नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे.

-पंडित पवळे
नांदेड

ग्रामीण विद्यार्थ्यांना विद्यापीठाची अनोखी सफर; कुलगुरूंशी साधला थेट संवाद

सायाळ येथील जिल्हा परिषद शाळेच्या ७० विद्यार्थ्यांनी घेतला विद्यापीठ भेटीचा अनुभव

नांदेड (प्रतिनिधी)– ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठाचे कामकाज आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची प्रत्यक्ष माहिती व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सायाळ (ता. नांदेड) येथील ७० विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्याशी संवाद साधण्याची अनोखी संधी मिळाली.



विशेष म्हणजे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांचा नुकताच झालेला वाढदिवस विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरूंनी विद्यार्थ्यांसाठी विशेष वेळ देत प्रत्येक विद्यार्थ्याचे नाव विचारून त्यांच्याशी आपुलकीने संवाद साधला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. विद्यार्थ्यांसोबत छायाचित्रे काढून त्यांनी त्यांच्या आनंदात सहभाग घेतला. विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधांचीही व्यवस्था करण्यात आली होती.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांची भेट घेतली. कुलगुरूंची केबिन पाहणे, त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधणे आणि विद्यापीठातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटणे, हा ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी अनुभव ठरला.

या शैक्षणिक भेटीच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक माणिक भोसले यांच्यासह शिक्षक केंद्रे, कांबळे, शिक्षिका दुथडे, पत्की, गजभारे आणि तुमलवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यापीठाची ही भेट विद्यार्थ्यांच्या मनात उच्च शिक्षणाची प्रेरणा निर्माण करणारी आणि त्यांच्या ज्ञानविश्वाचा विस्तार करणारी ठरली.

बालकांच्या सुरक्षिततेसाठी कायद्याचे कवच; नायगावमध्ये 'सुरक्षित बचपन अभियान' सप्ताहाचा समारोप

शाळा-महाविद्यालयांत कायदेविषयक शिबिराचे आयोजन; बालकांचे हक्क, संरक्षण आणि सुरक्षित भवितव्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

नायगाव (प्रतिनिधी) – बालकांचे बालपण सुरक्षित, निर्भय आणि आनंददायी असावे, तसेच त्यांना त्यांच्या हक्कांची आणि संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती व्हावी या उद्देशाने तालुका विधी सेवा समिती, नायगाव (बा.) यांच्या वतीने २७ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या 'सुरक्षित बचपन अभियान' सप्ताहाचा समारोप करण्यात आला. या सप्ताहानिमित्त तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये कायदेविषयक जनजागृती शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रम्हे आणि सचिव एस. जी. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका विधी सेवा समिती, नायगाव (बा.) यांच्या वतीने विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.

नायगाव येथील यमुनाबाई माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज, गुरुकुल पब्लिक स्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नायगाव कॅम्प, कोकलेगाव, देगाव तसेच देगलूर रोडवरील नरसी येथील अपंग निवासी विद्यालयात ही शिबिरे घेण्यात आली.

या शिबिरांमध्ये तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर प्रसाद एस. ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बालकांचे अधिकार, त्यांचे संरक्षण, सुरक्षित बालपणाचे महत्त्व आणि बालकांच्या हितासाठी अस्तित्वात असलेल्या कायदेशीर तरतुदी याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. समाजात वावरताना विद्यार्थ्यांनी स्वतःची सुरक्षितता कशी जपावी, कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी योग्य व्यक्तींची मदत कशी घ्यावी, याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले.



तालुका विधी सेवा समितीच्या रिटेनर वकील ॲड. एस. जी. कोकणे आणि ॲड. के. जी. शिनगारे यांनीही विद्यार्थ्यांना 'सुरक्षित बचपन अभियान' या उपक्रमाची उद्दिष्टे आणि महत्त्व समजावून सांगितले.

केवळ बालकांचे संरक्षण करणे एवढाच या अभियानाचा उद्देश नसून, विद्यार्थ्यांमध्ये स्वतःच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना सुरक्षिततेची जाणीव करून देणे आणि बालस्नेही समाजनिर्मितीला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.

कुपोषण निर्मूलनासाठी महाराष्ट्रात पथदर्शी प्रकल्प राबविण्याची मागणी

आरोग्यमंत्री आबिटकर यांच्याकडे डॉ. यशवंत चव्हाण यांचे निवेदन

नांदेड (प्रतिनिधी)– महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती आणि त्याचा बालकांच्या पोषणावर होणारा संभाव्य परिणाम लक्षात घेता, कुपोषण निर्मूलन हा राज्याच्या आरोग्य विभागाचा सर्वोच्च प्राधान्यक्रम असावा, अशी मागणी डॉ. यशवंत चव्हाण (बालरोगतज्ज्ञ) यांनी केली आहे.

नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री आबिटकर यांची भेट घेऊन त्यांनी महाराष्ट्रात कुपोषण निर्मूलनासाठी एक पथदर्शी प्रकल्प राबविण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती केली.

राज्यातील दुष्काळी परिस्थिती, ग्रामीण भागातील आर्थिक अडचणी आणि बालकांच्या पोषणविषयक समस्या यांचा विचार करता कुपोषण निर्मूलनासाठी आरोग्य विभागाने विशेष पुढाकार घेण्याची गरज आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून कुपोषित बालकांची वेळेवर ओळख, नियमित आरोग्य तपासणी, योग्य पोषण मार्गदर्शन, पालकांचे समुपदेशन आणि विविध विभागांच्या समन्वयातून प्रभावी उपाययोजना करता येऊ शकतील, असे मत त्यांनी व्यक्त केले.



या पथदर्शी प्रकल्पाचा लाभ नांदेड जिल्ह्यातील बालकांना मिळावा आणि जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच जिल्हा शल्यचिकित्सक यांनी या संधीचा प्रभावी उपयोग करून घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. यशवंत चव्हाण यांनी 'Health Algorithm' हे पुस्तक आरोग्यमंत्र्यांना भेट दिले. हे पुस्तक डॉ. एस. वाय. चव्हाण लिखित असून Lichtblick Publications तर्फे प्रकाशित करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय संदर्भांच्या आधारे दैनंदिन आरोग्य समस्यांची वैज्ञानिक माहिती आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणारे हे पुस्तक आहे.

आता या प्रस्तावावर आरोग्य विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्यचिकित्सक कोणत्या प्रकारे पुढाकार घेतात, याकडे लक्ष असणार आहे. कुपोषणमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने हा उपक्रम एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकतो, असे मत डॉ. चव्हाण यांनी व्यक्त केले आहे.

गोकुंदा येथे ग्रामीण पोलीस ठाण्यासह इतर मागण्यांबाबत किनवटच्या शिष्टमंडळाने घेतली पोलीस अधीक्षकांची भेट

किनवट (प्रतिनिधी)– गोकुंदा परिसरात वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, येथे स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाणे सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या मागणीसह किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांच्या बदलीची मागणी करीत सोमवारी (दि. २ नोव्हेंबर) शिष्टमंडळाने नांदेडचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

गोकुंदा येथील स्व. बाळासाहेब ठाकरे चौक हा परिसरातील प्रमुख बाजारपेठेचा आणि वर्दळीचा भाग आहे. या परिसरात शाळा, महाविद्यालये, खासगी शिक्षण संस्था, पोलीस प्रशिक्षण केंद्र, उपजिल्हा रुग्णालय आणि आदिवासी प्रकल्प कार्यालय असल्याने विद्यार्थी, महिला, रुग्णांसह नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाण्याअभावी परिसरातील नागरिकांना सुरक्षिततेबाबत चिंता सतावत आहे.



दरम्यान, दि. २२ व २३ ऑक्टोबर २०२६ रोजी ठाकरे चौकात दोन गटांत धारदार शस्त्रांनी झालेल्या तुंबळ हाणामारीत अनेकजण गंभीर जखमी झाले होते. या घटनेमुळे गोकुंदा परिसरासह किनवटमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, व्यापारी आणि व्यावसायिकांमध्येही भीती पसरली आहे. या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी गोकुंदा येथे स्वतंत्र ग्रामीण पोलीस ठाणे तातडीने मंजूर करून कार्यान्वित करण्याची मागणी करण्यात आली.

परिसरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यात पोलीस प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप करीत पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांची तातडीने बदली करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच किनवट पोलीस ठाण्यात सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करून रिक्त पदे तातडीने भरावीत, अशीही मागणी करण्यात आली.

अवैध मटका, जुगार, गुटखा विक्री, अवैध दारू वाहतूक व विक्री तसेच गांजासारख्या अमली पदार्थांच्या अवैध व्यवहारांविरोधात विशेष मोहीम राबवावी. सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून ठाकरे चौकातील हाणामारी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही शिष्टमंडळाने केली.

या शिष्टमंडळात माजी नगराध्यक्ष इसा खान, व्यंकटराव नेम्मानीवार, व्यंकटअण्णा भंडारवार, मारुती सुंकलवाड, संदीप निखाते, आशिष देशपांडे यांच्यासह अन्य नागरिकांचा सहभाग होता.

नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षपदी प्रभाकर पाटील कदम



लोहा (प्रतिनिधी)– शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत महत्त्वपुर्ण समजल्या जाणाऱ्या नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी प्रभाकर पाटील कदम यांची निवड झाली आहे.

नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्ष व कार्यकारिणी सदस्यांची जागा रिक्त होती. तेव्हा नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाने लोहा तालुक्यातील धावरी येथील नंदिकेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाचे संचालक प्रभाकर पाटील कदम यांची नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड केली तर कार्यकारिणी सदस्य म्हणून त्र्यंबक पाटील चव्हाण यांची निवड केली आहे.

सदरील निवडीबद्दल आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, सामाजिक कार्यकर्त्या तथा नांदेड जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. प्रणिताताई देवरे, नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाचे सचिव संजय शिप्परकर, शिक्षण अधिकारी माधव सलगर, मुख्याध्यापक संघाचे महाराष्ट्र सचिव अशोक मोरे, मोतीभाऊ केंद्रे, मुख्याध्यापक संघाचे सचिव मोहन फाजगे, विलास नागेश्वर, बबन खांडेकर, जय महाराष्ट्र पांगरीचे मुख्याध्यापक पवार यांच्यासह नांदेड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

नांदेडमध्ये ७० पुरुष होमगार्डचे उजळणी प्रशिक्षण शिबीर उत्साहात संपन्न

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्हा होमगार्ड प्रशिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित जिल्ह्यातील ७० पुरुष होमगार्डचे उजळणी प्रशिक्षण शिबीर नुकतेच उत्साहात पार पडले.

होमगार्डचे जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्यातील ७० पुरुष होमगार्डचे उजळणी प्रशिक्षण शिबीर दि. २६ ऑक्टोबर २०२६ ते २ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत होमगार्ड जिल्हा प्रशिक्षण केंद्राच्या कवायत मैदानावर घेण्यात आले.



सदर शिबीर केंद्र नायक संतोष जैस्वाल यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले. या शिबिरात होमगार्डच्या प्राथमिक प्रशिक्षणाची उजळणी करण्यात आली. मानसेवी निदेशक तथा वरिष्ठ पलटन नायक बशिरोद्दीन शेख, बळवंत अटकोरे यांनी पद कवायत, शस्त्र कवायत, प्रथमोपचार, आपत्ती व्यवस्थापन, पूर विमोचन आदींचे प्रशिक्षण दिले. पोलीस मुख्यालयातील वरिष्ठ निदेशक आर. के. कांबळे यांनी जमाव नियंत्रण तसेच कायदा आणि सुव्यवस्था याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आठ दिवस चाललेल्या या शिबिराचे कर्तव्य अधिकारी म्हणून नांदेड पथकाचे समादेशक अधिकारी प्रकाश कांबळे यांनी नियंत्रकाची जबाबदारी पार पाडली.

शिबीर यशस्वीतेसाठी प्रशासकीय अधिकारी वैशाली डवरे, प्रमुख लिपीक अभिजीत देशमुख, कनिष्ठ लिपीक पूजा शिंदे, वाहन चालक हनुमंत देवकत्ते, संगणक चालक सिद्धार्थ पवार यांनी मोलाचे सहकार्य केले.

शिबिरातील सुरक्षिततेची जबाबदारी गार्ड कमांडर पलटन नायक प्रशांत जोंधळे यांच्या नेतृत्वाखाली भारत कंधारे, गोविंद चिखलवाड, संतोष चव्हाण यांनी पार पाडली.

रामतीर्थला मिळणार हक्काचे तलाठी भवन

नवीन इमारतीच्या बांधकामाचे उत्साहात भूमिपूजन; नागरिकांच्या सोयीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल

शंकरनगर (प्रतिनिधी)– बिलोली तालुक्यातील रामतीर्थ सज्जातील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या नवीन तलाठी भवनाच्या इमारतीचे भूमिपूजन दि. २ नोव्हेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. नवीन तलाठी भवनाच्या उभारणीमुळे महसूल विभागाच्या कामकाजासाठी नागरिकांना स्वतंत्र कार्यालयीन सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना सातबारा उतारा, फेरफार नोंदी, उत्पन्न व रहिवासी दाखले तसेच विविध महसुली कामांसाठी तलाठी कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. त्यामुळे रामतीर्थ येथे सुसज्ज तलाठी भवन उभारले जाणे ही नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाची बाब मानली जात आहे.

या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी रामतीर्थ सज्जाचे तलाठी विजय पाटील जाधव, शिवसेनेचे तालुकाप्रमुख बाबुराव पाटील रोकडे, दादाराव पाटील, श्याम तोडे पाटील, भगवान रोकडे, श्रीकांत पाटील पुयड, सतीश चंदने, ओमकार पंधरवडे, शिवराज पाटील यांच्यासह देगलूर येथील स्थानिक नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

नवीन तलाठी भवनाचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन नागरिकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, अशी अपेक्षा यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



नवीन नांदेड (प्रतिनिधी)– शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या वाढदिवसा-निमित्त महात्मा गांधी निवासी अपंग विद्यालय व ज्ञानगंगा प्राथमिक शाळा शंकरनगर सिडको गुरुवार बाजार येथे शालेय विद्यार्थ्यांना वही, पेन व परीक्षा पॅडचे वाटप आयोजक शिवसेनेचे उपशहरप्रमुख पप्पू गायकवाड यांच्या वतीने करण्यात आले.

यावेळी जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, माजी शहर प्रमुख साहेबराव मामीलवाड, दलित मित्र माधव आंबटवाड, कृष्णा पांचाळ, आनंदराव गायकवाड, दशरथ कंधारे, रवी थोरात, युवा सेनेचे शहरप्रमुख गौरव दरबस्तवार, गोपीराज आंबटवाड, मनोज नवघरे, साहेबराव डाकोरे, रवी रायभोळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते, शाळेतील शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते.

वाढदिवसाच्या निमित्ताने जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांचा उपशहरप्रमुख पप्पू गायकवाड व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

किनवटमध्ये गर्भसंस्कार शिबीर उत्साहात



किनवट (प्रतिनिधी)– येथील श्री गजानन महाराज मंदिरात सोमवार, दि. २ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. नारायण महाराज माधापूरकर यांच्या उपस्थितीत गर्भसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विशेष मार्गदर्शन करताना नारायण महाराज यांनी संस्कारांचे महत्त्व विशद केले. मनुष्याच्या जडणघडणीत संस्कारांची भूमिका महत्त्वपूर्ण असून, गर्भावस्थेपासूनच चांगले विचार, सकारात्मक दृष्टिकोन आणि उत्तम संस्कारांची रुजवण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. गर्भसंस्कार शिबीर हा श्रेष्ठ कार्याचा उपक्रम असून, अशा उपक्रमांमुळे समाजाला चांगली दिशा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

शिबिरात गर्भसंस्काराचे महत्त्व, गर्भवती महिलांसाठी आवश्यक आहार, योगासने, प्राणायाम तसेच गर्भवती महिलांनी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले.

शिबिराच्या आयोजनासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला. या उपक्रमाला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. गर्भवती माता आणि भावी पिढीच्या आरोग्यदायी जडणघडणीसाठी अशा शिबिरांचे आयोजन उपयुक्त ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

रामदास तांडा येथे आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्याची मागणी

प्रा. डी. आर. पवार यांनी आरोग्यमंत्र्यांना दिले निवेदन

नांदेड (प्रतिनिधी)– मुखेड तालुक्यातील रामदास पवार तांडा येथे तात्काळ आरोग्य उपकेंद्र मंजूर करावे, अशी आग्रही मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रा. डी. आर. पवार यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. विशेष म्हणजे, या उपकेंद्राच्या उभारणीसाठी प्रा. पवार यांनी स्वतःच्या मालकीची २ हजार स्क्वेअर फूट जागा मोफत दान करण्याची तयारी दर्शवली आहे.

स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही रामदास तांडा आणि परिसरातील तांडे व वाड्यांमधील नागरिकांना कोणत्याही मूलभूत आरोग्य सुविधा मिळालेल्या नाहीत. उपचारासाठी येथील ग्रामस्थांना उदगीर (४० किमी), मुक्रमाबाद (१५ किमी), सावरगाव माळ (८ किमी) किंवा देगलूर (२५ किमी) असा लांबचा



आणि खडतर प्रवास करावा लागतो. हा संपूर्ण भाग अतिशय डोंगराळ असून येथे बहुसंख्येने बंजारा (लमाणी) समाज वास्तव्यास आहे. वेळेवर वैद्यकीय मदत न मिळाल्याने अनेकदा रुग्णांचे हाल होतात.

रामदास तांडा येथे आरोग्य उपकेंद्र झाल्यास चिचतापल्ली तांडा, सावळी तांडा आणि परिसरातील इतर वाड्या-वस्त्यांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे. या लोककल्याणकारी कामात कोणताही अडथळा येऊ नये म्हणून प्रा. डी. आर. पवार यांनी त्यांच्या गट नंबर ८३६ मधील स्वतःच्या मालकीची २ हजार स्क्वेअर फूट जागा उपकेंद्रासाठी दान देण्याचे जाहीर केले आहे. शासनाने या गंभीर समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर उपकेंद्र मंजूर करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

फॅशन|संसार|सौंदर्य

सखी



कार्यालयातून आल्यावर पतीचा आराम, पत्नीची पुन्हा ड्युटी सुरू...

विवाहसंस्थेतील असमानतेवर महिलेचा परखड सवाल

लग्नानंतर खरोखरच मुलींचे आयुष्य सुखकर होते की त्यांच्या वाट्याला जबाबदाऱ्यांचा डोंगर येतो? पती, मुले, घर आणि नोकरी यांचा समतोल साधताना पत्नी स्वत:च्या इच्छा, स्वप्ने आणि करिअरकडे दुर्लक्ष करते का? या प्रश्नांवर डिजिटल कंटेंट निर्माती सोनाली सिंह यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या 'स्ट्रीट इंटरव्ह्यू'मध्ये महिलांनी मनमोकळेपणाने मते मांडली. त्यातील एका महिलेने केलेले भाष्य विशेष लक्षवेधी ठरत असून, विवाहातील समानता आणि महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याबाबत नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. या महिलेच्या मते, मुलींनी लग्न करण्यापेक्षा आधी स्वत:च्या पायावर उभे राहण्याला आणि स्वत:ची कमाई सुरू करण्याला प्राधान्य द्यावे. कारण नोकरी करणाऱ्या महिलांनाही कार्यालयीन काम संपल्यानंतर घर आणि मुलांची जबाबदारी पार पाडावी लागते. त्यामुळे आर्थिक स्वावलंबनाबरोबरच घरातील जबाबदाऱ्यांचे समान वाटप होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

» कार्यालयातून घरी आल्यानंतर पत्नीची दुसरी पाळी सुरू! : नोकरी करणाऱ्या महिलांची व्यथा मांडताना या महिलेने एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. एखादी महिला दिवसभर कार्यालयात काम करून घरी परतली, तरी तिचे काम संपत नाही. घरी आल्यानंतर स्वयंपाक, घराची स्वच्छता, मुलांची देखभाल आणि कुटुंबातील इतर जबाबदाऱ्या तिची वाट पाहत असतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करूनही तिला पुरेसा आराम मिळत नाही. दुसरीकडे, अनेक कुटुंबांमध्ये पती कार्यालयातून परतल्यानंतर आराम करतात; मात्र पत्नीची घरातील कामांची दुसरी पाळी सुरू होते. पती- पत्नी दोघेही नोकरी करून कुटुंबाच्या आर्थिक गरजा पूर्ण करत असतील, तर घरकाम आणि मुलांच्या संगोपनाची जबाबदारी केवळ पत्नीवरच का असावी, असा रास्त सवाल या महिलेने उपस्थित केला आहे.

» लग्नानंतर प्रत्येक तडजोड पत्नीनेच का करावी? : नात्यात प्रेम, विश्वास आणि एकमेकांना साथ देण्याच्या गप्पा मारल्या जातात. मात्र प्रत्यक्ष जबाबदाऱ्या पार पाडण्याची वेळ आली की अनेकदा पत्नीवरच अधिक अपेक्षांचे ओझे टाकले जाते. मुलांचे शिक्षण, घरातील कामे, कुटुंबातील सदस्यांची काळजी आणि इतर कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना महिलांना स्वतःच्या करिअरशी आणि आवडीनिवडींशी तडजोड करावी लागते. अनेक महिला कुटुंबासाठी स्वतःची स्वप्ने बाजूला ठेवतात. मात्र विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींनी एकत्र राहणे नव्हे, तर एकमेकांच्या जबाबदाऱ्या समजून घेणे आणि त्या समानतेने पार पाडणे होय. पत्नी प्रत्येक आघाडीवर एकटीच झटत असेल, तर पतीच्या सहजीवनातील सहभागाला अर्थ काय, असा प्रश्नही या चर्चेतून पुढे येतो.

» मुलगी कमावती असेल तर लग्नाची घाई कशाला? : या महिलेने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. एखादी मुलगी चांगले उत्पन्न मिळवत असेल आणि स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यास सक्षम असेल, तर तिने लग्नाची घाई करण्याची आवश्यकता काय? ती स्वतःच्या आवडीनुसार, स्वाभिमानाने आणि आनंदाने स्वतंत्र आयुष्य जगू शकते. लग्न करणे हा प्रत्येक महिलेचा वैयक्तिक निर्णय असायला हवा. केवळ वय वाढत आहे, समाज काय म्हणेल किंवा नातेवाईक प्रश्न विचारतील, म्हणून विवाह करण्याची सक्ती असू नये. आयुष्याचा जोडीदार निवडण्याची इच्छा असेल, तरच लग्नाचा निर्णय घ्यावा, असा संदेश या महिलेने दिला आहे.

» पालकांनी मुलींना आधी आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे : मुलींच्या संगोपनाबाबतही या महिलेने पालकांना महत्त्वाचा सल्ला दिला आहे. मुलींना केवळ लग्नासाठी तयार करण्याऐवजी त्यांना शिक्षण, नोकरी आणि आर्थिक स्वावलंबनासाठी प्रोत्साहन द्यावे. घराबाहेर पडून स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी द्यावी. मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे बळ मिळाले, तर त्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय स्वतः घेऊ शकतात. स्वतःच्या गरजांसाठी त्यांना दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागणार नाही. लग्न हा आयुष्यातील एक महत्त्वाचा निर्णय असू शकतो; मात्र लग्न म्हणजे संपूर्ण आयुष्य नव्हे, हे प्रत्येक मुलीला समजावून सांगण्याची गरज आहे.

चॉकलेट वॅक्स की हनी वॅक्स?

केस काढण्यासाठी कोणता पर्याय ठरेल योग्य? पार्लरमध्ये गोंधळून जाण्याऐवजी जाणून घ्या फरक!

हात-पायांवरील अनावश्यक केस काढण्यासाठी पार्लरमध्ये गेल्यानंतर अनेक प्रकारच्या वॅक्सचे पर्याय समोर ठेवले जातात. हनी वॅक्स, चॉकलेट वॅक्स, व्हाइट चॉकलेट वॅक्स, फ्रूट वॅक्स किंवा हार्ड वॅक्स अशा विविध प्रकारांमुळे नेमकी कोणती वॅक्स निवडावी, असा प्रश्न अनेकांना पडतो. काही वॅक्समुळे त्वचेवरील मृत पेशी निघून जातात, तर काही वॅक्स त्वचेला आर्द्रता आणि पोषण देण्याचा दावा करतात. मात्र, केवळ त्वचेचा रंग उजळण्याचे किंवा केस पुन्हा उगवण्यास अधिक वेळ लागण्याचे दावे ऐकून वॅक्सची निवड करणे योग्य नाही. त्वचेचा प्रकार, संवेदनशीलता, वॅक्सचे तापमान आणि शरीराचा कोणता भाग स्वच्छ करायचा आहे, या बाबी लक्षात घेऊनच योग्य पर्याय निवडला पाहिजे...



सॉफ्ट वॅक्स : हात-पायांसारख्या मोठ्या भागांसाठी उपयुक्त

पार्लरमध्ये सर्वाधिक वापरली जाणारी सॉफ्ट वॅक्स ही मऊ स्वरूपाची असते. ती केस काढण्यासाठी विशिष्ट पट्ट्यांच्या (स्ट्रिप्स) साहाय्याने काढली जाते. हात, पाय, पाठ आणि पोट यांसारख्या शरीराच्या मोठ्या भागांवरील केस काढण्यासाठी तिचा वापर केला जातो. ही वॅक्स किंचित गरम करून लाकडी किंवा प्लास्टिकच्या सपाट साधनाने केसांच्या वाढीच्या दिशेने त्वचेवर लावली जाते. त्यावर वॅक्सिंगची पट्टी चिकटवून केसांच्या वाढीच्या विरुद्ध दिशेने ती झटकन ओढली जाते. त्यामुळे केस मुळासकट निघण्यास मदत होते. हनी वॅक्स आणि व्हाइट चॉकलेट वॅक्स हे सॉफ्ट वॅक्सचे लोकप्रिय प्रकार आहेत. मात्र, प्रत्येक प्रकारातील घटक आणि त्वचेवरील परिणाम वेगवेगळे असू शकतात.

हनी वॅक्स : मृत पेशी काढण्यास मदत



हनी वॅक्स तयार करण्यासाठी मधाबरोबरच मधमाशांच्या मेणाचा (बी वॅक्स), नैसर्गिक किंवा कृत्रिम राळीचा आणि काही प्रकारच्या तेलांचा वापर केला जातो. या घटकांमुळे काही हनी वॅक्स त्वचेवर तुलनेने अधिक गरम जाणवू शकतात. त्यामुळे वॅक्सचे तापमान तपासूनच ती त्वचेवर लावणे आवश्यक आहे. केस काढण्याबरोबरच काही प्रकारच्या हनी वॅक्समुळे त्वचेवरील मृत पेशीही निघून जातात. त्यामुळे वॅक्सिंगनंतर त्वचा अधिक स्वच्छ आणि उजळ दिसू शकते. मात्र, त्वचेचे किती प्रमाणात वरील थर निघतात, हे वॅक्समधील घटकांवर अवलंबून असते. संवेदनशील त्वचा असलेल्या व्यक्तींनी हनी वॅक्स वापरताना विशेष काळजी घ्यावी. वॅक्सचे तापमान जास्त असल्यास भाजण्याचा धोका असतो. तसेच काही घटकांची ॲलर्जी असल्यास त्वचेवर पुरळ, लालसरपणा किंवा खाज येऊ शकते.

शुगरिंग वॅक्स : घरच्या घरी करता येणारा पर्याय

शुगरिंग ही केस काढण्याची पारंपरिक पद्धत आहे. साखर, लिंबाचा रस आणि पाणी यांचा वापर करून तयार केलेल्या घट्ट मिश्रणाचा यामध्ये उपयोग केला जातो. या पद्धतीत वॅक्सिंगच्या पट्ट्यांची आवश्यकता नसते. शुगरिंगमध्ये मिश्रण केसांच्या वाढीच्या विरुद्ध दिशेने लावले जाते आणि केसांच्या वाढीच्या दिशेने ते काढले जाते. त्यामुळे केस मुळासकट निघण्यास मदत होऊ शकते. हे मिश्रण खोलीच्या तापमानाला किंवा किंचित कोमट अवस्थेत वापरले जाते. त्यामुळे अतिउष्ण वॅक्समुळे भाजण्याचा धोका तुलनेने कमी असतो. शुगरिंगमुळे त्वचेवर कमी घर्षण होऊ शकते; मात्र त्यामुळे लालसरपणा, खाज किंवा ॲलर्जी होणारच नाही, असे नाही. लिंबाच्या रसामुळे काही व्यक्तींना त्वचेची जळजळ होऊ शकते. त्यामुळे संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी.

चॉकलेट वॅक्स : कोरड्या त्वचेसाठी पर्याय

चॉकलेट वॅक्स केवळ तिच्या सुगंधामुळे लोकप्रिय नाही, तर त्यातील काही घटकांमुळेही तिचा वापर केला जातो. या वॅक्समध्ये कोको, सोयाबीन तेल, बदामाचे तेल, ग्लिसरीन आणि विविध जीवनसत्त्वांचा समावेश असू शकतो. हे घटक त्वचेला आर्द्रता आणि पोषण देण्यास मदत करतात. त्यामुळे सामान्य ते कोरडी त्वचा असलेल्या व्यक्तींसाठी चॉकलेट वॅक्स हा एक पर्याय ठरू शकतो. वॅक्सिंगनंतर त्वचेतील कोरडेपणा कमी जाणवू शकतो आणि त्वचा मऊ दिसू शकते. ही वॅक्सदेखील पट्ट्यांच्या साहाय्याने काढली जाते. मात्र, चॉकलेट वॅक्समध्ये वापरल्या जाणाऱ्या काही प्रकारच्या राळीमुळे (रेझिन) किंवा कोलोफोनीमुळे काही व्यक्तींना ॲलर्जी होऊ शकते. त्यामुळे अतिसंवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी घटकांची माहिती घेणे आवश्यक आहे.

व्हाइट चॉकलेट वॅक्स : संवेदनशील त्वचेसाठी निवडताना काळजी

व्हाइट चॉकलेट वॅक्सचे काही प्रकार संवेदनशील आणि कोरड्या त्वचेसाठी तुलनेने सौम्य मानले जातात. विशेषतः त्यामध्ये कोलोफोनी राळ नसल्यास ॲलर्जीचा धोका काही प्रमाणात कमी होऊ शकतो. ही वॅक्स तयार करताना ग्लिसरीन, वनस्पतीजन्य तेल, टायटॅनियम डायऑक्साइड, मधमाशांचे मेण, झिंक ऑक्साइड आणि व्हाइट कोको यांसारख्या घटकांचा वापर केला जाऊ शकतो. काही प्रकारांमध्ये राळ नसल्यामुळे केस काढताना त्वचेवर होणारी ओढ कमी जाणवू शकते. मात्र, व्हाइट चॉकलेट वॅक्स प्रत्येक संवेदनशील त्वचेसाठी पूर्णपणे सुरक्षित असते, असे मानता येणार नाही. तिच्यातील इतर घटकांचीही ॲलर्जी असू शकते. त्यामुळे वापरण्यापूर्वी त्वचेच्या छोट्या भागावर चाचणी करणे हितावह ठरते.

फ्रूट वॅक्स : फळांच्या अर्कांचा वापर



फ्रूट वॅक्समध्ये विविध फळांचे अर्क वापरले जातात. या अर्कांमुळे त्वचेला काही प्रमाणात पोषण मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे काही प्रकारच्या फ्रूट वॅक्सचा वापर संवेदनशील त्वचेसाठीही केला जातो. मात्र, केवळ फळांचे अर्क आहेत म्हणून ही वॅक्स सुरक्षित असेलच असे नाही. त्यामध्ये वापरलेली राळ, रासायनिक घटक किंवा सुगंधी द्रव्यांमुळे त्वचेवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. त्यामुळे फ्रूट वॅक्स निवडण्यापूर्वी तिच्यातील घटक तपासणे महत्त्वाचे आहे.

हार्ड वॅक्स : चेहरा, काख आणि बिकिनी भागासाठी पर्याय

हार्ड वॅक्स ही सॉफ्ट वॅक्सपेक्षा वेगळी असते. फिल्म वॅक्स, बीन वॅक्स आणि ब्राझिलियन वॅक्स यांचा या प्रकारात समावेश होतो. ही वॅक्स गरम करून केस काढायच्या भागावर जाड थराच्या स्वरूपात लावली जाते. काही सेकंदांनी ती थंड होऊन घट्ट होते. त्यानंतर कोणत्याही पट्टीचा वापर न करता वॅक्सचा थर हातानेच काढला जातो. चेहरा, काख आणि बिकिनी भागासारख्या तुलनेने संवेदनशील ठिकाणांवरील केस काढण्यासाठी हार्ड वॅक्सचा वापर केला जातो. लहान भागांमध्ये तिचा वापर होत असल्याने केस तुटण्याची शक्यता काही प्रमाणात कमी होऊ शकते. मात्र, केस किती दिवसांनी पुन्हा उगवतील, हे प्रत्येक व्यक्तीच्या केसांच्या वाढीच्या चक्रावर अवलंबून असते. हार्ड वॅक्सचा एकाच जागेवर वारंवार वापर केल्यास त्वचेचा वरचा थर निघण्याची किंवा त्वचेला इजा होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रशिक्षित व्यक्तीकडूनच योग्य पद्धतीने वॅक्सिंग करून घेणे आवश्यक आहे.

वॅक्सची निवड करताना या गोष्टी लक्षात ठेवा



वॅक्सिंग करण्यापूर्वी आपल्या त्वचेचा प्रकार आणि केस काढायचा भाग लक्षात घ्या. वॅक्समधील घटकांची माहिती घ्या. प्रथमच एखादी नवीन वॅक्स वापरणार असाल, तर त्वचेच्या छोट्या भागावर चाचणी करा. वॅक्सचे तापमान योग्य असल्याची खात्री करा. त्वचेवर जखम, संसर्ग, पुरळ किंवा तीव्र जळजळ असल्यास त्या भागावर वॅक्सिंग टाळा. कोणतीही एक वॅक्स सर्वांसाठी सर्वोत्तम नसते. त्वचेची संवेदनशीलता, वॅक्समधील घटक आणि केस काढण्याचा भाग यांचा विचार करूनच योग्य पर्याय निवडणे महत्त्वाचे आहे. केवळ जाहिरातीतील दावे किंवा पार्लरमधील आकर्षक नावे पाहून वॅक्सची निवड करू नका.

भारतीय त्वचेच्या रंगानुसार मेकअपची योग्य निवड कशी कराल?

नैसर्गिक सौंदर्य खुलवण्यासाठी त्वचेचा रंग आणि अंतर्गत छटाही ओळखा; चुकीच्या फाउंडेशनमुळे चेहरा अन् मानेच्या रंगात दिसू शकतो फरक

लग्नसमारंभ असो किंवा एखादी खास पार्टी, प्रत्येक महिलेला आपला मेकअप आकर्षक दिसावा आणि चेहऱ्यावर नैसर्गिक तेज यावे, असे वाटते. यासाठी अनेक जणी महागड्या सौंदर्यप्रसाधनांची खरेदी करतात. मात्र, तरीही अपेक्षित परिणाम मिळतोच असे नाही. यामागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्वचेच्या रंगाला अनुरूप नसलेल्या फाउंडेशन, ब्लश किंवा हायलाइटरची निवड. काही जणी गोरे दिसण्यासाठी आपल्या त्वचेच्या मूळ रंगापेक्षा फिकट रंगाचे फाउंडेशन वापरतात. त्यामुळे चेहरा आणि मान यांच्या रंगात स्पष्ट फरक दिसू लागतो. वास्तविक, मेकअपचा उद्देश त्वचेचा मूळ रंग बदलणे नसून नैसर्गिक सौंदर्य अधिक खुलवणे हा असतो. विशेषतः नववधूच्या मेकअपमध्ये योग्य रंगसंगती आणि सौंदर्यप्रसाधनांची निवड महत्त्वाची ठरते. भारतीय त्वचेच्या विविध रंगछटांनुसार मेकअपची निवड कशी करावी, हे जाणून घेऊया...

त्वचेच्या रंगाबरोबर अंतर्गत छटाही ओळखा

फाउंडेशन खरेदी करताना केवळ त्वचेचा बाह्य रंग पाहणे पुरेसे नसते. त्वचेची अंतर्गत रंगछटा (अंडरटोन) समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सामान्यतः त्वचेच्या अंतर्गत छटांचे तीन प्रकार मानले जातात.

» उबदार छटा (वॉर्म अंडरटोन) : त्वचेमध्ये सोनेरी किंवा पिवळसर छटा जाणवते.

» थंड छटा (कूल अंडरटोन) : त्वचेमध्ये गुलाबी किंवा लालसर छटा दिसते.

» तटस्थ छटा (न्यूट्रल अंडरटोन) : त्वचेमध्ये उबदार आणि थंड अशा दोन्ही छटांचे मिश्रण असते.

» एकाच रंगाची त्वचा असलेल्या दोन व्यक्तींनाही वेगवेगळ्या छटांचे फाउंडेशन अधिक चांगले दिसू शकते. त्यामुळे फाउंडेशन हातावर लावून त्याची निवड करू नये. जबड्याच्या रेषेवर लावून मानेपर्यंत व्यवस्थित मिसळावे आणि नैसर्गिक प्रकाशात त्याचा रंग तपासावा.

» फाउंडेशनची योग्य छटा कशी निवडाल? : फाउंडेशन हा मेकअपमधील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. त्याची छटा योग्य नसेल, तर संपूर्ण मेकअपचा लुक बिघडू शकतो. त्यामुळे आपल्या त्वचेच्या मूळ रंगापेक्षा खूप फिकट फाउंडेशन निवडणे टाळावे. चेहऱ्यावर सहज मिसळणारे आणि मानेच्या रंगाशी जुळणारे फाउंडेशन निवडणे योग्य ठरते. फाउंडेशनची छटा तपासण्यासाठी ते हातावर लावण्याऐवजी जबड्याच्या रेषेवर (जॉलाइन) लावावे. त्यानंतर मानेच्या दिशेने हलकेच पसरवावे. फाउंडेशन त्वचेत नैसर्गिकरीत्या मिसळत असेल आणि वेगळे उठून दिसत नसेल, तर ती छटा योग्य असण्याची शक्यता असते. विशेषतः वधूच्या मेकअपसाठी ही काळजी घेणे आवश्यक आहे. कारण लग्नातील छायाचित्रे आणि चित्रफितींमध्येही चेहरा नैसर्गिक दिसणे महत्त्वाचे असते.

» मेकअपच्या रंगांमध्ये योग्य सुसंवाद हवा : मेकअप करताना फाउंडेशन, ब्लश आणि हायलाइटर यांच्या रंगांमध्ये योग्य सुसंवाद असणे आवश्यक आहे. सौंदर्यतज्ज्ञांच्या मते, मेकअपचा उद्देश गोरे दिसणे नसून त्वचा निरोगी, तजेलदार आणि आकर्षक दिसणे हा असावा. विशेषतः लग्नासाठी मेकअपची साधने खरेदी करताना ती नैसर्गिक सूर्यप्रकाशात तपासावीत. तसेच छायाचित्रे आणि कॅमेऱ्याच्या प्रकाशात मेकअप कसा दिसतो, हेही पाहावे. अनेकदा आरशात सुंदर दिसणारा मेकअप छायाचित्रांमध्ये अधिक पांढरट किंवा अतिशय चमकदार दिसू शकतो. त्यामुळे प्रत्यक्ष



वापरापूर्वी मेकअपची चाचणी घेणे फायद्याचे ठरते.

» ब्लशच्या योग्य छटेमुळे चेहऱ्याचे सौंदर्य खुलते... : गालांवर ब्लश लावल्यामुळे चेहऱ्याला नैसर्गिक गुलाबीपणा येतो आणि चेहरा अधिक ताजातवाना दिसतो. भारतीय त्वचेच्या विविध रंगछटांवर पीच, उबदार गुलाबी, कोरल, बेरी आणि टेराकोटा यांसारख्या छटा चांगल्या दिसू शकतात. मात्र, योग्य रंगाची निवड त्वचेच्या बाह्य आणि अंतर्गत रंगछटांवर अवलंबून असते. वधूच्या मेकअपमध्ये क्रीम ब्लश लावल्यानंतर त्यावर हलक्या हाताने पावडर ब्लश लावल्यास रंग अधिक काळ टिकण्यास मदत होऊ शकते. ब्लश एकाच वेळी जास्त प्रमाणात लावू नये. थोड्या प्रमाणात लावून आवश्यकतेनुसार त्याची तीव्रता वाढवावी. त्यामुळे गालांवरील रंग नैसर्गिक दिसतो आणि चेहऱ्याचे सौंदर्य अधिक खुलते.

» हायलाइटरमुळे चेहऱ्यावर येईल नैसर्गिक चमक : हायलाइटरचा वापर चेहऱ्यावरील विशिष्ट भाग उठावदार आणि चमकदार दिसण्यासाठी केला जातो. मात्र, त्याचा अतिवापर केल्यास चेहरा गरजेपेक्षा अधिक चमकदार दिसू शकतो. भारतीय त्वचेवर सोनेरी, शॅम्पेन आणि रोझ गोल्ड या रंगछटा चांगल्या दिसू शकतात. गालांच्या वरच्या हाडांवर (चीकबोन्स) आणि आवश्यकतेनुसार नाकाच्या वरच्या भागावर हायलाइटरचा हलका थर लावावा. विशेषतः नववधूच्या मेकअपसाठी चेहऱ्यावर नैसर्गिक तेज देणारे हायलाइटर निवडणे योग्य ठरते. हायलाइटर लावताना त्याचे प्रमाण आणि रंग यांचा समतोल राखणे महत्त्वाचे आहे.

लातूरच्या ११ वर्षीय जयराज भिकानेची आंतरराष्ट्रीय बुद्धिबळात बाजी

आंतरराष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांकासह फिडे रेटिंगची कमाई!



लातूर(प्रतिनिधी)–आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत लातूरच्या ११ वर्षीय जयराज शशिकिरण भिकाने याने चमकदार कामगिरी करत 'बेस्ट अनरेटेड' गटात प्रथम क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेतील कामगिरीच्या जोरावर जयराजने आपले पहिले आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग मिळवले आहे.

सोलापूर येथे झालेल्या जी. एच. रायसोनी मेमोरियल स्पर्धेत विविध भागांतील अनुभवी आणि मानांकित बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला होता. एकूण नऊ फेऱ्यांच्या या स्पर्धेत इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या लातूरच्या जयराज भिकाने याने आत्मविश्वासपूर्ण खेळ करत तब्बल सहा गुणांची कमाई केली. त्याची १६१८ इतकी परफॉर्मन्स रेटिंग नोंदली गेली असून, सर्वसाधारण क्रमवारीत त्याने ३६ वे स्थान मिळवले.

जयराजने आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग असलेल्या सहा खेळाडूंविरुद्धही दमदार खेळ करत त्यांना कडवी टक्कर दिली. त्यामुळे त्याच्यासाठी हा स्पर्धेतील विजयाबरोबरच आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. 'बेस्ट अनरेटेड' गटात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल जयराजला दोन हजार पाचशे रुपयांचे रोख पारितोषिक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. अवघ्या अकराव्या वर्षी आंतरराष्ट्रीय मानांकनाच्या स्पर्धेत सहा गुणांची कमाई करून फिडे रेटिंग मिळवणाऱ्या जयराजच्या या कामगिरीचे लातूरच्या क्रीडा क्षेत्रातून कौतुक होत आहे.

जयराजच्या या यशामुळे त्याच्या पुढील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वाटचालीसाठी नवी दिशा मिळाली असून, त्याच्याकडून भविष्यात आणखी दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जयराजच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, बुद्धिबळप्रेमी आणि विविध स्तरांतून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

नगर परिषद भोकर

जाहीर प्रगटन

सौ. शिवकांता भाऊराव कऱ्हाळे गट क्र. ५९२ प्लॉट क्र. १२, जुना वार्ड नं. ३, जुना मालमत्ता क्र. २५८१, नवीन वार्ड क्र. ०२, नवीन मालमत्ता क्र. ४४१ वर बांधकाम परवानगी मिळण्याकरिता नगर परिषद नोंदणीकृत आर्किटेक्ट इंजिनिअर यांचेद्वारे ऑनलाईन अर्ज सादर केला आहे. जागेची रुंदी उत्तर-दक्षिण ०९.१४ मीटर, जागेची रुंदी-पूर्व-पश्चिम-१२.१९ मीटर.

चतु:सीमा–

पूर्वेस-२० फुट रोड, पश्चिमेस-प्लॉट क्र. ११, दक्षिणेस-२० फुट रोड, उत्तरेस-प्लॉट क्र. २१. वरील चतु:सीमेतील जागेवर बांधकाम परवानगी देणेबाबत कोणाची काही हरकत असल्यास संबंधितांनी आवश्यक लेखी, पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगर परिषद भोकर यांचेकडे दाखल करावेत. मुदतीनंतर प्राप्त हरकतीबाबत कोणताही उजर ऐकून घेतला जाणार नाही.

मुख्याधिकारी
नगर परिषद, भोकर

Change In Name

My old name is SHAMSHAD BEGUM which now am changing as New Name SHAMSHAD BGUM SYED AMJAD ALI Hence forth my all correspondence will be done as per my New name. please consider the same.

Address- SHAMSHAD BEGUM SYED AMJAD ALI H.No. 1-1-36, LALWADI, RAILWAY MARG, SHIVAJINAGAR, POST SHIVAJI NAGAR, Nanded 431602 Maharashtra,India Mob. No. 9881227485

Change In Name

My old name is **SYED AMJAD ALI** which now am changing as New Name SYED **AMJAD ALI SYED ALI** Hence forth my all correspondence will be done as per my New name. please consider the same. Address -SYED AMJAD ALI SYED ALI H.No. 1-1-36,LALWADI,RAILWAY MARG,SHIVAJINAGAR,POST SHIVAJI NAGAR, Nanded 431602 Maharashtra,India Mob. No. 9881227485

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, 'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४६१ ६०६.

दीक्षांत समारंभ सूचना

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा **२९ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार, दि.११ डिसेंबर, २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता** विद्यापीठाचे **मा. कुलपती महोदय** यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विद्यापीठाचे **मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु व सर्व प्राधिकरण सदस्य** यांच्या उपस्थितीत विद्यापीठ प्रांगणात संपन्न होणार आहे सदरील दीक्षांत समारंभाची विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली सर्व माहिती विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जाहीर प्रगटन

मौजे नेरली ता. जि. नांदेड ग्रामपंचायत हद्दीतील शेत गट नं. १२७ मधील प्लॉट क्र. ३८ ज्याची साईज ३० बाय ४० असून, एकूण क्षेत्रफळ १२०० चौरस फुटाचा प्लॉट शेख उस्मान शेख नादर रा. सौमय्या कॉलनी नांदेड यांचेकडून प्रतीक प्रकाश गच्चे रा. प्रभातनगर नागसेन हायस्कूल जवळ नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सीमा–

पूर्वेस – प्लॉट नं. ४१, पश्चिमेस – प्लॉट नं. १५,
दक्षिणेस – १५ फुट रुंद रोड, उत्तरेस – प्लॉट नं. २७.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत प्रतीक प्रकाश गच्चे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
प्रतीक प्रकाश गच्चे
रा. प्रभातनगर,
नागसेन हायस्कूल जवळ,नांदेड

जाहीर प्रगटन

मला माझे पक्षकार मिरा उर्फ शितल पि. अरविंद अमृते, रा. उमरी (ज) ता. हदगांव जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी हे जाहिर प्रगटन देत आहे की,

